# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल:pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ : साफुपुवि/निवि/ ३७७

दिनांक : ८ सप्टेंबर २०२५

## स्मरणपत्र

१) मा. प्राचार्य/मा. संचालक
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

२) मा. विभाग प्रमुख
विद्यापीठ शैक्षणिक विभाग,
प्रस्तुत विद्यापीठ

विषय : विद्यापीठाचा वार्षिक अहवाल २०२४—२५ साठी ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करणेबाबत...
(माहितीचा कालावधी — दि. १ जुलै, २०२४ ते दि. ३० जून, २०२५)

संदर्भ : १) या विभागाचे पत्र संदर्भ क्र. साफुपुवि/निवि/२८७ दिनांक ०३/०७/२०२५.
२) या विभागाचे पत्र संदर्भ क्र. साफुपुवि/निवि/३५८ दिनांक १९/०८/२०२५.

महोदय/महोदया,

आपणांस विदित आहेच की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३६ मधील तरतूदीनुसार विद्यापीठाचा वार्षिक अहवाल महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर विहित कालावधीत सादर करणे बंधनकारक आहे. यास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे विद्या विषयक, संशोधन व विकास विषयक अन्य कार्यक्रम समाविष्ट असलेला वार्षिक अहवाल प्रतिवर्षी तयार केला जातो. सदर वार्षिक अहवालामध्ये समाविष्ट माहितीचा उपयोग शासन स्तरावर विविध धोरणात्मक निर्णयांसाठी केला जातो.

संदर्भ पत्र क्र.१ अन्वये विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४—२५ च्या वार्षिक अहवालासाठी ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करण्याची मुदत दिनांक ०४ जुलै, २०२५ ते १४ ऑगस्ट, २०२५ अशी निश्चित करण्यात आली होती.

संदर्भ पत्र क्र. २ अन्वये सदर मुदत दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ पर्यंत वाढविण्यात आलेली होती. परंतु सदरची मुदतवाढ देण्यात येऊनही काही संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी माहिती सादर केलेली नाही. या पत्रान्वये माहिती सादर करण्यासाठी अंतिम मुदत **दिनांक १६ सप्टेंबर, २०२५** पर्यंत देण्यात येत आहे.

सदर माहितीची पूर्तता विहित मुदतीत न झाल्यास शासनाकडून व विद्यापीठाकडून विविध योजनेअंतर्गत मिळणारे अर्थसहाय्य, सोयी/सवलती, पुरस्कार व इतर लाभ प्रलंबित राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच या कालावधीनंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४—२५ च्या वार्षिक अहवालासाठी ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करण्याची लिंक खालील प्रमाणे आहे.

**www.unipune.ac.in – Home page - BOD Online – Login Page - Login with you Credentials – Dashboard -- Annual Report**

आपली विश्वासू,

डॉ. वैशाली साकोरे
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)

प्रत — माहितीसाठी :
मा. प्र-कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ.